**निविदा विक्री किंमत : रु.२०००/-**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# करार पध्दतीने मुला/मुलींचे वसतिगृह मेस चालविण्यासाठीची निविदा शैक्षणिक वर्ष -२०२५-२६

# *तांत्रिक बीड*

**<u>निविदाधारकाने आपल्या भरलेल्या निविदासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रे खालीलप्रमाणे</u>**

**** (Check List)****

१) निविदा किंमत रु.२०००/-रक्कमेचा डी.डी.

२) बयाना रु.५०,०००/- रक्कमेचा डी.डी.

३) संस्थेचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम २०१८ नमुना प्रमाणपत्र

४) भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण नोंदणी प्रमाणपत्र (अधिनियम -२००६ अंतर्गत )

५) आधार कार्ड व पॅन कार्ड छायांकित प्रत

६) रहिवास दाखला

७) दोन शिफारसदार व्यक्तींचे ओळखपत्र

८) मेस/खानावळ चालविण्याचा अनुभव दाखाला

९) पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र पडताळणी दाखला

१०) तांत्रिक बीडचा लिफाफा स्वतंत्र परंतु मेस टेंडरच्या मूळ लिफाप्यामध्ये टाकूण दयावा.

# करार पध्दतीने मुला/मुलींचे वसतिगृह मेस चालविण्यासाठीची निविदा

- **मेस निविदा प्रसिध्दीची तारीख-** — **दि. 27/ 05/.2025 वार: मंगळवार**
- **सिलबंद निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळ** — **दि. 16/06/2025 वार: सोमवार रोजी दुपारी 4.30 वाजेपर्यंत (प्रसिध्दी दिनांकापासून 21 दिवस)**
- **तांत्रिक बीड उघडून कागदपत्रे छाननीची तारीख व वेळ (Check List)** — **दि.19/06/2025 गुरुवार रोजी सकाळी 11.00 वाजता**
- **आर्थिक बीड /सिलबंद निविदा उघडण्याण्याची तारीख व वेळ** — **यथावकाश कळविली जाईल**

**ठिकाण** - **कक्ष क्र.४३२, प्रशासकीय इमारत, कबचौ उमवि, जळगाव**

## * कबचौ उमवि मुला/मुलींचे वसतिगृह निवास क्षमता *

| अ.क्र. | वसतिगृहाचे नाव | क्षमता |
|---|---|---|
| १ | मुलांचे वसतिगृह क्र. १ | १४२ विद्यार्थी |
| २ | मुलांचे वसतिगृह क्र. २ | १९७ विद्यार्थी |
| ३ | मुलांचे वसतिगृह क्र. ३ | २२२ विद्यार्थी |
| ४ | डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मुलांचे वसतिगृह | २०८ विद्यार्थी |
| ५ | मुलींचे वसतिगृह क्र. १+२ | १४४ विद्यार्थीनी |
| ६ | मुलींचे वसतिगृह क्र. ३ | १७३ विद्यार्थीनी |
| ७ | बाबु जगजीवन राम मुलींचे वसतिगृह | २०७ विद्यार्थीनी |
| ८ | अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह | १०४ विद्यार्थीनी |
| ९ | नवीन मुलींचे वसतिगृह क्र. ४ | २४१ विद्यार्थीनी |

# आर्थिक बीड

निविदा धारकाचे छायाचित्र

**प्रति,**
**मा.कुलसचिव,**
क ब चौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

**महोदय,**

आपण दिलेली दिनांक / /२०२५ च्या दैनिक ____________________मधील "मेसनिविदा" वाचली. त्यानुसार मी आपल्या विद्यापीठ परिसरात असलेले **मुलांचे वसतिगृह क्र.१/२/३, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मुलांचे वसतिगृह मुलींचे वसतिगृह क्र.१+२,३ /बाबु जगजीवन राम मुलींचे वसतिगृह / अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह / नवीन मुलींचे वसतिगृह क्र. ४** ची मेस चालवू इच्छित आहे. वरील बाबतीत आवश्यक असणारी सर्व माहिती खालीलप्रमाणे :

१) संस्थेचे संपुर्ण नाव : ____________________

२) निविदाधारकाचे संपुर्ण नाव :____________________

३) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ____________________
(दूरध्वनी क्रमांकासहीत ) ____________________

४) आधार कार्ड नंबर व :____________________
पॅन कार्ड नंबर :____________________

५) रहिवास दाखला :____________________

६) पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र : होय / नाही.
पडताळणी दाखला जोडला आहे का ? :____________________

७) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम २०१८ नमुना प्रमाणपत्र जोडले आहे का? : होय / नाही. ____________
नोंदणी क्रमांक व दिनांक :____________________

८) भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का? : होय / नाही. ____________
(अधिनियम -२००६ अंतर्गत ) क्रमांक :____________________

९) मेस/खानावळ चालविण्याचा अनुभव किती वर्षाचा आहे. ? (महिने/वर्ष): ______________________________

अनुभव दाखला देणा-या संस्थेचे नाव संपूर्ण पत्ता फोन नं. /मो.नं.______________________________

(ईमेलसह) ______________________________

१०) निविदा किंमत रु.२०००/-रक्कमेचा डी.डी. क्रमांक, : ______________________________

बँकेचे नाव व दिनांक : ______________________________

११) बयाना रक्कमेचा रु.५०,०००/- डी.डी.क्रमांक : ______________________________

बँकेचे नाव व दिनांक ______________________________

**(टिप :- वरील सर्व दाखल्यांच्या छायांकित प्रती जोडा )**

मी, आपल्या मेस निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्या मला मंजूर आहेत. मी विद्यापीठाच्या मेससाठी दोन्ही वेळच्या भोजनाचे एकूण बील (सर्व देय करांसहीत) प्रतिमाहे प्रतिविद्यार्थी रु . __________ (अक्षरी रुपये ______________________________ ) प्रमाणे आकारण्यासाठी प्रस्तावीत आहे. तरी मला सेवेची संधी द्यावी ही नम्र विनंती.

निविदाधारकांची सही व नाव

दिनांक : / / २०२५ ( ______________________________ )

# मेसच्या अटी व शर्ती

टिप :-मेस निविदेसोबत पोलीस अधिक्षक यांचेकडील चारीत्र्य पडताळणी दाखला सोबत जोडणे आवश्यक राहील.

१) मेस निविदा फॉर्म विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेसोबत रुपये २०००/- (अक्षरी दोन हजार मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट "**वित्त व लेखाअधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**" या नावाने सादर करणे आवश्यक आहे. परिपूर्ण भरलेली निविदा **मुलांचे वसतिगृह क्र. ०३** येथे जमा करावी.

२) मेस निविदेसोबत सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या मेस परवान्याची साक्षांकित केलेली सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे, तसेच **मेस बयाना रक्कम** म्हणुन रुपये **५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र)** चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट "**वित्त व लेखा अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**" यांच्या नावे मेस निविदेसोबत जोडावा. ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत होणार नाही त्या निविदा धारकास बयाना रक्कमेचा तोच डिमांड ड्राफ्ट परत केला जाईल.

तसेच जे निविदाधारक मेस ठेका देण्यास पात्र होतील त्या निविदाधारकास खालील तक्त्याप्रमाणे मेस निहाय सुरक्षा अनामत रक्कम "**वित्त व लेखा अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**" यांचे नांवे काढलेला डिमांड ड्राफ्ट ने मेस आदेश स्विकृत करणेपूर्वी विद्यापीठात द्यावा लागेल.

**मुलां/मुलींचे वसतिगृह मेस सुरक्षा अनामत रक्कम खालील प्रमाणे मेस सुरु होण्यापूवी भरावी लागेल.**

| अ.क्र. | मेसचे नाव | मेस सुरक्षा अनामत रक्कम | पात्र निविदाधारकांनी बयाना रक्कम वजावट करुन भरावयाची मेस सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | मुलांचे वसतिगृह क्र.१ | ९०,०००/- | ४०,०००/- |
| ०२ | मुलांचे वसतिगृह क्र.२ | १,२०,०००/- | ७०,०००/- |
| ०३ | मुलांचे वसतिगृह क्र.३ | १,३५,०००/- | ८५,०००/- |
| ०४ | डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम मुलांचे वसतिगृह | १,१०,०००/- | ६०,०००/- |
| ०५ | मुलींचे वसतिगृह क्र. १+२ | ९०,०००/- | ४०,०००/- |
| ०६ | मुलींचे वसतिगृह क्र.३ | १,१०,०००/- | ६०,०००/- |
| ०७ | बाबु जगजीवन राम मुलींचे वसतिगृह | १,२०,०००/- | ७०,०००/- |
| ०८ | अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह | ६०,०००/- | १०,०००/- |
| ०९ | नवीन मुलींचे वसतिगृह क्र. ४ | १,४०,०००/- | ९०,०००/- |

मेस सुरक्षा अनामत रक्कम मेस कराराचा कालावधी संपल्यानंतर वसतिगृह कार्यालयातुन ना-हरकत प्रमाणपत्र घेवून परत दिली जाईल. भरलेल्या मेस सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

३) ठेकेदाराने भरलेली मेस निविदा विद्यापीठाने स्विकारल्यास त्याबाबत ठेकेदारास पत्रान्वये कळविण्यात येईल,तसेच कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

४) विद्यापीठाचे कर्मचारी /अधिकारी व प्राधिकरणांच्या कोणत्याही सदस्यास व त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस ठेका घेता येणार नाही.

५) वसतिगृह मेसला व्यवस्थापन परिषद सदस्य,अधिसभा सदस्य तसेच विद्यापीठातील इतर अधिकारी केव्हाही भेट देतील व मेस मधील खाद्य पदार्थांची प्रतवारी तपासतील.खाद्य पदार्थांची प्रतवारी चांगल्या प्रतीची नसल्यास किंवा कमी दर्जाची असल्यास मेस कंत्राट रद्द करण्याचा किंवा दंडात्मक कारवाई करण्याचा सर्व अधिकार वसतिगृह व्यवस्थापन समितीस राहील.

६) सदरचा करार हा मुद्रांकावर स्वाक्षरी झाल्याच्या दिनांकापासून इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे पुढील ११ महिन्यासाठी परवाना धारकाची निवड करण्यात येईल. भविष्यात मेस ठेकेदाराने समाधानकारक सेवा पुरविल्यास व त्यांचेबद्दल कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नाहीत . असे विद्यापीठाचे मत झाल्यास सदरच्या कराराचे पुन्हा सलगच्या ११ महिन्याच्या कालावधीसाठी ०२ वेळेस त्याच दरामध्ये नूतनीकरण करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

७) ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत केली जाईल त्यांना **वसतिगृह व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या** रोजी मेस सुरु करणे बंधनकारक राहील.त्यांनी जर मेस चालविण्यास असमर्थता दर्शविली, तर त्यांची संपुर्ण मेस बयाना रक्कम रु. **५०,०००/- (रु.अक्षरी.पन्नास हजार रुपये मात्र** ) जप्त करण्यात येईल व मेस ठेका पुढील ठेकेदारास वाटाघाटी करुन देण्यात येईल.

८) निविदा स्विकृत केलेल्या ठेकेदारास मेसच्या अटी व शर्तीचा करारनामा रुपये **५००/- (रुपये पाचशे मात्र)** च्या कोर्ट फी स्टॅम्पवर मेस सुरु होण्यापूर्वी नोंदणीकृत नोटरी करुन द्यावी लागेल.

९) ठेकेदाराला काही कारणास्तव नेमून दिलेल्या करार कालावधीच्या आत मेस रद्द अथवा बंद करावयाची असल्यास त्यासंबंधी ठेका रद्द करण्याच्या तारखेपूर्वी **४५ (पंचेचाळीस)** दिवस अगोदर लेखीपत्राद्वारे सबळ कारणासह मा.कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरीउत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना कळविणे आवश्यक राहील. तसे न केल्यास मेस अटी व शर्तीनुसार त्यांची संपुर्ण मेस सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) एका नोंदणीकृत संस्थेला एकचं मेस ठेका देण्यात येईल. तसेच कोणता मेस ठेका कोणत्या निविदाधारकास द्यावा याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राहतील. मेसमध्ये जेवणाच्या वेळेस सकाळी व संध्याकाळी मेस ठेकेदारास स्वतःउपस्थित रहाणे आवश्यक आहे.

११) ज्या नोंदणीकृत संस्थेला मेस ठेका मिळालेला असेल त्याच्या जवळच्या नातेवाईकाला / रक्ताच्या नात्यामधील कोणत्याही संस्थेला इतर वसतिगृहांचा मेस ठेका देण्यात येणार नाही.(जसे की- मुलगा-मुलगी,बहीण-भाऊ, काका-काकू,मामा-मामी,पत्नी, आई, जावई, शालक व इतर रक्ताचे नाते)

१२) मेसचा ठेका दुसऱ्यास हस्तांतरीत करता येणार नाही अथवा पोट- ठेकेदार नेमता येणार नाही. तसे आढळल्यास विद्यापीठ नियमानुसार कायदेशीर कारवाई करुन **मेस सुरक्षा अनामत** रक्कम जप्त करण्यात येईल.

१३) मेसमधील खाद्य पदार्थांची प्रत तपासण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१४) विद्यापीठामार्फत मेसमध्ये भोजनकक्ष, स्वयंपाकगृह व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या बाबींचे मेस ठेका कालावधीसाठी रु.३००००/- (अक्षरी रु. तीस हजार मात्र) भाडे मेस सुरु होण्यापूर्वी भरावे लागेल. स्वयंपाकगृह भोजनकक्ष आवार स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मेस ठेकेदाराची असेल.

१५) मेसमध्ये वीज वापरासाठी विद्यापीठाकडून विद्युत मीटर बसवून देण्यात आले आहेत. त्यांच्या मासिक आकारणीनुसार देय रक्कम ठेकेदाराकडून घेण्यात येईल. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार वीज वापराचे बिल दरमहा भरावे लागेल. मेस ठेकेदरांकडे वीज बील थकल्यास दंडासह रक्कम वसूल करण्यात येईल.

१६)वसतिगृहात निवासास असणाऱ्या मुला-मुलींना वसतिगृहातील मेसमध्ये जेवण घेणे अपेक्षीत आहे.आपल्या मेसमध्ये जेवढे विद्यार्थी मेस लावण्यास इच्छुक असतील त्या मुला-मुलींसाठी टेंडर कालावधीसाठी मेस चालविणे बंधनकारक राहील.

१७)शैक्षणिक सहल व फिल्ड वर्क साठी विद्यार्थी जात असतील आणि विद्यार्थ्यांने मेस ठेकेदारास लेखी पूर्व सुचना दिल्यास त्या विद्यार्थ्याचे मेस खाडे संबंधीत विभागानुसार ग्राह्य धरण्यात येतील. तसेच हिवाळी व उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत मेस खाडे ग्राह्य धरण्यात येतील.

१८) दैनंदीन भोजनात खालील पदार्थांचा समावेश असेल - त्यात विद्यार्थी / विद्यार्थीनींच्या हितानुसार व मा.रेक्टरांच्या संमतीनुसार वेळोवेळी योग्य तो बदल करण्यात येईल.

## मुला/मुलींचे वसतिगृह मेस मेनू

| | |
|---|---|
| **सकाळचे जेवण,**<br>**वेळ सकाळी ११.३० ते २.०० वाजेपर्यत** | १) गव्हाच्या पोळया (चपात्या) |
| | २) भात |
| | ३) वरण |
| | ४) कोरडी भाजी |
| | ५) पातळ भाजी/उसळ |
| | ६) कांदा,लिंबू,टमाटा,बीट,काकडी यापैकी जे उपलब्ध असेल ते (कमीतकमी यापैकी दोन सलाद द्यावे.) |
| | ७) चटणी/लोणचे, पापड (मर्यादीत)<br>८) दही/ताक आवश्यकतेनुसार साखर (मर्यादीत) |

| | |
|---|---|
| **संध्याकाळचे जेवणाची**<br>**वेळ- संध्या -७.०० ते १०.०० वाजेपर्यत** | १) गव्हाच्या पोळया (चपात्या),पराठे/दशम्या |
| | २) वरण -भात किंवा खिचडी |
| | ३) कढी |
| | ४) कोरडी भाजी/पातळ भाजी |
| | ५)कांदा,लिंबू,टमाटा,बीट,काकडी यापैकी जे उपलब्ध असेल ते (कमितकमी यापैकी दोन सलाद द्यावे) |
| | ६) चटणी/लोणचे,पापड (मर्यादीत) |

| | |
|---|---|
| **प्रत्येक १५ दिवसाच्या रविवारी दुपारी फिस्ट पूढीलप्रमाणे :-**<br>एका मेससाठी पहिला आणि तिसरा रविवार<br>दुसऱ्या मेससाठी दुसरा व चौथा रविवार<br><br>**(फिस्टच्या दिवशी संध्याकाळी कढी व खिचडी द्यावी)**<br>स्वातंत्र दिन,प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, शिव जंयती , डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती, पदवीप्रदान सोहळा व विद्यापीठ नामांतर दिन या दिवशी फिस्ट द्यावी लागेल.<br>फिस्टच्या दिवशी जेवणाची वेळ<br>**सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यत असेल** | १) पनीर भाजी/मसाले भाजी |
| | २) बटाटा भाजी / उसळ |
| | ३) पुलाव किंवा मसाले भात |
| | ४) चपाती / पुरी / पराठा |
| | ५) भजी |
| | ६) पापड (मर्यादीत) |
| | ७) लोणचे व कोशिंबीर (मर्यादीत) |
| | ८) कांदा,लिंबू,टमाटा,बीट,काकडी यापैकी जे उपलब्ध असेल ते (कमीतकमी यापैकी दोन सलाद द्यावे) |
| | ९) गोड पदार्थ -जिलेबी, श्रीखंड,बासुंदी, गुलाबजामून, मुगाच्या डाळीचा शिरा . (मर्यादीत)<br>**सदर स्वीट मेनुची पुनरावृत्ती (Repeat) करु नये.** |

**टिप :- उपरोक्त मेनू प्रमाणे जेवण व जेवणात समाविष्ट केलेले पदार्थ न दिल्याचे आढळल्यास संबंधित मेस ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.**

***मेस ठेकेदाराने सर्व वस्तु उच्च प्रतीच्या दर्जाच्या खरेदी कराव्यात.***

१९)मेसमधील कोणत्याही साहित्याची नासधूस,मोडतोड,चोरी,अपहार इत्यादी प्रकारे झालेले नुकसान मेस ठेकेदाराला भरुन द्यावे लागेल

२०) मेस सुरु झाल्याच्या पहिल्या दिवसापासूनच भांडी, पाणी, खाद्यपदार्थ तसेच स्वयंपाकगृह, भोजनकक्ष,व टेबल याबाबत स्वच्छता असणे, नोकरांचे कपडे विशिष्ट गणवेशात स्वच्छ व निटनेटके असणे आवश्यक आहे. किचन ॲप्रान, डोक्यावर टोपी असणे आवश्यक आहे. तसेच बाल कामगार कायद्याचे पालन करुन, १८ वर्षे वयाच्या आतील व्यक्तीस नोकर म्हणून कामावर ठेवू नये. त्याचप्रमाणे यासंदर्भातील कोणत्याही कायद्याचे उल्लंघन ठेकेदाराने करु नये. तसे केल्यास विद्यापीठ व विद्यापीठाचे कोणतेही अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी मेस ठेकेदाराची राहील.त्याचप्रमाणे नोकरांची वैद्यकीय तपासणी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून करुन घेणे बंधनकारक राहील. नोकरांचे वैद्यकीय तपासणी केल्याचे मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट वसतिगृह अधिक्षक / वसतिगृह अधिक्षीका यांना सादर करावे. तसेच नोकरांचा विमा असावा. मेस मध्ये ठेकेदाराची आणि मेस मधील इतर नोकरवर्गाची वागणूक सहकार्याची आणि सौजन्यपुर्ण असली पाहीजे. ठेकेदाराने त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तसेच ठेक्या बाबत संपूर्ण कामगार कायदे,स्थायी आदेश यांचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राहील.त्याबाबतची कागदपत्रे त्यांनी दरमहा किमान एकदा संबंधित वसतिगृह कार्यालयात दाखविणे आवश्यक राहील.

२१) मेसमध्ये काम करतांना एखाद्या कामगारास इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही मेस ठेकेदाराची राहील.

२२) मेसमध्ये धूम्रपान,गुटखा,तंबाखुयुक्त पदार्थ, तसेच अल्कोहोलयुक्त पेय इत्यादींची विक्री किंवा सेवन करता येणार नाही. जर असे आढळल्यास त्वरीत मेस ठेका रद्द करण्यात येईल.

२३) विद्यार्थ्यांशिवाय इतर कोणालाही मेस मध्ये जेवण देण्यास बंदी राहील. परंतु विद्यार्थ्यांचे पालक/पाहुणे/विद्यापीठ कर्मचारी यांना गेस्ट चार्ज आकारुन मेसमध्ये जेवण देता येईल. तसेच विद्यापीठातील कार्यक्रम किंवा सभेला जेवण लागल्यास मा.कुलसचिवांच्या पूर्वपरवानगीने देता येईल. या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाला वा व्यक्तीला मेसमधील जेवण देण्यास प्रतिबंध राहील.

२४) विद्यापीठात विविध खेळ /कार्यक्रमासाठी /महाविद्यालयीन मुलांचे व मुलींचे सराव शिबीर आयोजित करण्यात येतात. या शिबिरांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना संचालक/कुलसचिव सांगतील त्या मेस ठेकेदाराला त्यांना जेवण मेसच्या दरात द्यावे लागेल. त्याची पूर्व कल्पना सदर मेस ठेकेदारास देण्यात येईल.

२५) मेस ठेकेदारांनी विद्यार्थ्यांकडील मेस बील स्वतः वसूल करावे व त्याची रितसर बीलाची पावती वेळोवेळी संबंधितांना द्यावी. जेवणाबाबतचे पावती बुक हे संस्थेच्या नावानेचं (नोंदणी क्रमांकसह) छापलेले असणे अनिवार्य आहे. **विद्यार्थ्यांकडून मेस ची रक्कम वसूल करण्याची सर्वस्वी जबाबदारी मेस ठेकेदाराची राहिल.**

२६) विद्यार्थ्याची मागणी असल्यास मेस ठेकेदाराने सकाळी नाश्ता देणे बंधनकारक राहील. त्याकरीता खाद्य पदार्थांचे दर वसतिगृह व्यवस्थापन समितीने ठरवून दिल्या प्रमाणे राहतील.

२७) मेस ठेकेदारानी विद्यार्थ्याशी वादविवाद न करता विद्यार्थ्याबाबत तक्रार असल्यास वसतिगृह कार्यालयात त्वरीत संपर्क करावा.

२८) मेसमध्ये जेवण करीत असतांना जर मुलांच्या व मुलींच्या ताटामध्ये काही अनपेक्षीतपणे किडे, अळी,झुरळ इ. निघाले तर वसतिगृह अधिक्षक /वसतिगृह अधिक्षीका किंवा त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी हे त्वरीत रेक्टर यांना अहवाल सादर करतील. नंतर रेक्टर हे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील. गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे, अन्न व औषध विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. ठेकेदाराने पुरविलेले खाद्यपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास व सिध्द झाल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील व मेस ठेका रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्या मेस ठेकेदाराला विद्यापीठाच्या काळ्या यादीत टाकले जाऊन त्याला पुढील निविदा भरण्याचा हक्क राहणार नाही.

२९) वसतिगृहाचा मेस ठेका मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत अन्नाची तपासणी अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ अंतर्गत food Technology UICT या विभागाकडून अन्नाची तपासणी करण्यात येईल. पुढील ठेका हा त्या अहवालावर अवलंबून राहील. आवश्यक असल्यास food & drugs विभागाकडून तपासणी करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

३०) वरील पैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास त्या संदर्भात मेस ठेकेदाराचे म्हणणे ऐकून घेवून सदर ठेका रद्द करण्याचा सर्व अधिकार मा.वसतिगृह व्यवस्थापन समितीस राहील आणि तो निर्णय मेस निविदा धारकास बंधनकारक राहील.

३१) मेस मध्ये एका वेळेस उपयोगात येणा-या प्लॅस्टीकचा (Single Use Plastic) वापर करु नये. तसेच प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी तसे न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३२) मेस मधील उरलेले अन्न,खरकटे आणि सांडपाणी इतर अनावश्यक वाया जाणारे पदार्थांची विद्यापीठ परिसराबाहेर नेवून विल्हेवाट लावणे मेस ठेकेदारास बंधनकारक राहील.

३३) मेस व मेसचा आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मेस ठेकेदाराची राहील. तसेच भोजनकक्षामध्ये Fly catcher machine मेस ठेकेदारांनी लावणे सक्तीचे आहे.

३४) विद्यापीठाने मेस व्यवस्थापनाचे ऐन वेळेस घेतलेले निर्णय मेस धारकास बंधनकारक राहतील.

३५) मेस ठेक्यासंदर्भात काही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याचे कार्यकक्ष हे मे.न्यायालय जळगाव हे राहील.

३६) विशेषतः मुलींच्या वसतिगृहातील मेसमध्ये काम करण्यासाठी महिला कामगारचं असाव्यात याचे मेस ठेकेदाराने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

**मा. कुलसचिव**
**कबचौ उमवि,जळगाव**

वरील सर्व अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचून व समजून घेतल्या असून त्या मला बंधनकारक राहतील व त्यांचे मी तंतोतंत पालन करीन. मी निविदासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी व वैध असून त्यांची पडताळणी केल्यास त्यामध्ये काही खोटे /अवैध आढळल्यास मी शिक्षेस पात्र असेन.

**स्थळ :**

**दिनांक :** / / २०२५

**ठेकेदाराचे नाव व सही**

# हमीपत्र

**दि.** / /२०२५

==========================================================

श्री.________________________________________ यांचा खानावळ चालविण्याचा परवाना (मेस-परमीट) क्र.________________________हा असुन त्यांना मी स्वत: गेल्या _____ वर्षापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांनी खानावळ चालवितांना चांगला दर्जा राखला असल्याची माझी अनुभवाअंती धारणा झाली आहे.

**ओळख देणारे :-**

**१) नाव :- --------------------------------------------------**
**पत्ता :- --------------------------------------------------**
**--------------------------------------------------**
**मो. नं. ------------------------------**

**२) नाव :- --------------------------------------------------**
**पत्ता :- --------------------------------------------------**
**--------------------------------------------------**
**मो. नं. ------------------------------**

**आपला विश्वासु ,**
स्वाक्षरी व नाव

( १)______________________________ )

(२)________________________________)